प्रहार

# 'किचन क्लिनिक विथ चारमेअन' कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद



**अलिबाग (वार्ताहर) :** सीएफटीआय फाऊंडेशनच्या वतीने 'किचन क्लिनिक विथ चारमेअन' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्वयंपाकघरात अगदी सहज उपलब्ध असणाऱ्या आहारातील जिन्नस वापरून आरोग्य समस्या दूर करण्याचे उपाय सांगत चारमेअन डिसोजा यांनी चांगले आरोग्य परत मिळवून देण्यासाठी कानमंत्र दिला. हा कार्यक्रम २४ जानेवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत वेश्वी येथील मॅपल आयव्ही हॉटेलमध्ये संपन्न झाला.

यावेळी पीएनपी एज्युकेशनच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, माजी जि. प. सदस्य अ‍ॅड. आस्वाद पाटील, आंबेपूरच्या सरपंच भावना पाटील, युवा नेते सवाई पाटील, अ‍ॅड. नीता पाटील, नगरसेविका सुरक्षा शहा, वृषाली ठोसर, संजना कीर तसेच अन्य नगरसेवक, डॉ. राजश्री चांदोरकर, डॉ. विनायक पाटील, डॉ. प्रणाली पाटील, अ‍ॅड. सचिन जोशी, पत्रकार, राजकीय पुढारी तसेच अन्य मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सध्याच्या वेगवान व दगदगीच्या जीवनशैलीमुळे प्रत्येकाचीच तारांबळ होते. अशा परिस्थितीत आरोग्यविषयक निरनिराळ्या महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष देण्यासाठी, वेगवेगळ्या मसाल्यातील जिन्नसाचा कशा प्रकारे वापर करता येऊ शकतो, याबाबत माहिती असणे आवश्यक असते. किचन क्लिनिक विथ चारमेअन हा कार्यक्रम अलिबागमध्ये प्रथमच घेण्यात आला. या कार्यक्रमात आरोग्यविषयक समस्या सहज स्वयंपाकघरातील उपचारांचा वापर करून कशा पद्धतीने चांगले आरोग्य परत मिळेल, याबाबत उत्तम माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमात मोफत प्रवेश देण्यात आला होता. सहभागी झालेल्या प्रत्येकाचे बायो अ‍ॅनॅलिसिस करण्यात आले. त्यानंतर चारमेअन डिसोजा यांनी अ‍ॅनॅलिसिस रिपोर्टची तपासणी करून त्यानुसार सुयोग्य उपचारपद्धती समजावून सांगितल्या. चित्रलेखा पाटील यांनी आरोग्यविषयक पर्वणी दिल्याबद्दल सर्वांनी त्यांचे आभार व्यक्त केले.